सहाय्यक प्रशासन अधिकारी या संवर्गातील
कर्मचा-यांच्या स्थानांतरणाने नियुक्त्या
करणेबाबत २०२६

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/३३४४२८०/६२८/२०२६
अहिल्यानगर दिनांक २५/०६/२०२६

वाचा :- महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र-११२/आस्था-१४ दिनांक १५/०५/२०१४

संदर्भिय शासन निर्णयामधील मुद्दा क्र.८(७) मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार/तरतुदींनुसार जिल्हा परिषदेंतर्गत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सहाय्यक प्रशासन अधिकारी गट-क या संवर्गातील कर्मचा-यांचे त्यांच्या नावापुढील रकाना क्रमांक ३ येथून रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी स्थानांतरणाने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यरत ठिकाण | स्थानांतरणाने द्यावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीम.विद्या साहेबराव सांगळे | पंचायत समिती अहिल्यानगर | कृषि विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर |
| २ | श्री. हेमंत वसंतराव कुलकर्णी | कृषि विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर | पंचायत समिती अहिल्यानगर |

**वरील कर्मचा-यांना स्थानांतरणाने पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणेकामी आदेशाच्या दिनांकापासुन कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.** संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. १७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन आदेशाच्या दिनांकानंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत.

तसेच मुद्दा क्र. ८ (१) मध्ये नमुद केलेनुसार स्थानांतरण ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६(५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. वरीलप्रमाणे स्थानांतरण केलेल्या कर्मचा-यांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय असणार नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202606250401120 असा आहे.

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

संबंधित सहाय्यक प्रशासन अधिकारी,

द्वारा :- कार्यालय प्रमुख ................ (संबंधित)

प्रत :- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव रवाना

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद अहिल्यानगर.
२. ..............................................................................
३. निवड नस्ती/ कार्यासन आस्था-२, साप्रवि, जि.प.अहिल्यानगर